*निविदा मुल्य रुपये – १५,०००/-*

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

**पोष्ट – शिरडी -४२३१०९**

**ता.राहाता, जि. अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक – (०२४२३) २५८८५३, फॅक्स क्रमांक – २५८८७०

# *ई- निविदा*

***श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील लाडु प्रसाद, सुटी बुंदी प्रसाद** (आवश्यकता भासल्यास) **व बर्फी प्रसाद उक्त्या मजुरी दराने बनवुन देणेविषयीची ई-निविदा***

***सन – २०२२-२३***

**निविदाधारकाचे नाव –**

**पुर्ण पत्ता -**

**दुरध्वनी क्रमांक -**

**भ्रमणध्वनी क्रमांक -**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर, पीन कोड - ४२३१०९
*फोन नं. (०२४२३) २५८५०० / २५८८५३ फॅक्स नं. २५८८७०*
*(Website -www.shrisaibabasansthan.org, www.sai.org.in)*

# ई – निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरिता दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२३ या कालावधीसाठी मोतीचुर लाडु, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद उक्ते मजुरी दराने तयार करुन पॅकींग करुन देणे इ. कामांसाठी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | कामाचा तपशिल | निविदा कामाचे अंदाजे मुल्य | निविदा शुल्क | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ५० ग्रॅम वजनाचा मोतीचूर लाडू तयार करुन ०३ नगाचे व ०१ नगाचे पाकीट **हाताने** पॅकींग करणे | **रु.१.५० कोटी** | **रु.१५,०००/-** | **रु.२,००,०००/-** |
| २ | ५० ग्रॅम वजनाचा मोतीचूर लाडू तयार करुन ०३ नगाचे व ०१ नगाचे पाकीट **मशिनव्दारे** पॅकींग करणे | | | |
| ३ | सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पाकीटे **हाताने** पॅकींग करणे | | | |
| ४ | सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पाकीटे **मशिनव्दारे** पॅकींग करणे | | | |
| ५ | खोबरा / रवा बर्फी प्रसाद तयार करुन देणे. | | | |

१. यशस्वी निविदाकाराला निविदा कामाच्या मुल्याच्या ३% इतकी सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन संस्थानकडे जमा करावी लागेल.
२. लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करणे इ. कामाची ऑनलाईन ई - निविदा शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि.** / /२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. पासून डाऊनलोडींगसाठी उपलब्ध राहील.
३. ऑनलाईन निविदा दाखल करण्याची अंतिम मुदत **दि.** / /२०२२ सायं.०५.०० वा. पर्यंत राहील.
४. निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
५. तांत्रिक लिफाफा ०१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील निविदेत दिलेला आहे. सदरची सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online Upload केलेल्या निविदेचा / कागदपत्रांचाच विचार करणेत येईल. त्यामुळे सदर निविदेची/कागदपत्रांची Hard Copy संस्थानचे कार्यालयास जमा करु नयेत, ती स्विकारली जाणार नाहीत.
६. निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर जमा करणेत यावी.
७. तांत्रिक निविदा शक्य झाल्यास **दि.** / /२०२२ रोजी उघडण्यात येतील.
८. कोणतीही अथवा सर्व निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.),
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी**

पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा - अहमदनगर, पिन – ४२३ १०९

---

दुरध्वनी क्र. (०२४२३) २५८५००, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग - (०२४२३) २५८८५३

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७० Website- www.sai.org.in

---

**मुंबई कार्यालय-** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई -४०० ०१४ दुरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६

---

श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता **दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२३** या कालावधीकरिता उक्त्या मजुरी दराने -

१) मोतीचुर बुंदी लाडू तयार करुन ०३ नगाचे व ०१ नगाचे पाकीट हाताने व मशिनव्दारे पॅकींग करणे,

२) सुट्टी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पाकीटे हाताने व मशिनव्दारे पॅकींग करणे, (आवश्यकता भासल्यास)

३) खोबरा / रवा बर्फी बनवून देणे इ. कामांविषयीची ई-निविदा -

**निविदा किंमत रुपये- १५,०००/-**

**बयाणा रक्कम रुपये- २,००,०००/-**

**निविदा क्रमांक-**

निविदाधारकाचे नांव ---------------------------------------------------------------------------------

पत्ता- ---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी/मोबाईल नं.

---

***(कार्यालयीन कामाकाजाकरीता)***

## - निविदाधारकाबाबत माहीती-

१. फर्मचे / संस्थेचे नांव ------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता ---------------------------------------------------------------

३. दुरध्वनी क्रमांक- --------------------------------------------------------------------------

कार्यालय- ---------------------------------------------------------------------------------

निवास- -----------------------------------------------------------------------------------

फॅक्स नंबर – ------------------------------------------------------------------------------

ई- मेल- -----------------------------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव --------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक -------------------------------------------------------------------------------

५. मालकाचे / भागीदारांची नांवे १ ------------------------------------------------------

२ ------------------------------------------------------

६. **RTGS Details** –

१. बॅक खाते नंबर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

२. बॅकेचे नाव - ------------------------------------------------------------------

३. शाखा – ------------------------------------------------------------------

४. IFSC Code - ५. MICR Code -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

## - निविदाधारकांसाठी सूचना-

दिनांक- / /२०२२

**विषय- श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२३ या कालावधीकरीता उक्त्या मजुरी पध्दतीने मोतीचुर बुंदीचे लाडू, सुट्टी बुंदी** (आवश्यकता भासल्यास ) **व बर्फी प्रसाद तयार करुन देणेविषयीची ई-निविदा...**

वरील विषयाचे संदर्भातील ई - निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत. सदर ऑनलाईन निविदा भरतांना कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व अटीं-शर्तींचा तपशिल सोबत दिलेला आहे, त्यानुसार निविदा भरावयाची आहे.

२. निविदाधारकास निविदा शुल्क रक्कम रुपये १५,०००/- तसेच बयाणा रक्कम रु.२,००,०००/- शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जमा करुन त्याची पोहोच पावती निविदेसोबत जोडावी.

३. यशस्वी निविदाकाराला कामाच्या एकुण मुल्याच्या ३% इतकी सुरक्षा अनामत रक्कम ठेवावी लागेल. सदर रकमेस कोणतेही व्याज मिळणार नाही / मागता येणार नाही.

४. पुर्ण माहीती भरलेली निविदा विहीत मुदतीत सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर राहील, मुदतीत न आलेल्या तसेच अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

६. निविदा दि. / /२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि. / /२०२२ सायं.५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड व डाऊनलोंडीगसाठी उपलब्ध राहील.

७. ई-निविदा प्रक्रीयेमध्ये केवळ Online सादर केलेल्या कागदपत्रांचाच विचार करणेत येईल, त्यामुळे सदर कागदपत्रांची Hard Copies संस्थानचे कार्यालयास जमा करु नयेत, ती स्विकारली जाणार नाहीत.

८. निविदाधारकांनी Online BOQ मध्ये दर भरतांना GST वगळुन भरण्यात यावेत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.),
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

***श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे पत्र.***

---

दिनांक - / /२०२२

**प्रति,**

**मा. मुख्यकार्यकारी अधिकारी महोदया,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी

ता.राहाता, जि.अहमदनगर

**विषय- श्री साईबाबा संस्थानचे लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च, २०२३ या कालावधीकरीता उक्त्या मजुरी दराने मोतीचुर बुंदीचे लाडू, सुट्टी बुंदी** (आवश्यकता भासल्यास ) **व बर्फी प्रसाद तयार करुन देणेविषयीची ई-निविदा...**

मा.महोदया,

मी / आम्ही खालील सही करणार कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिध्द केलेली निविदेतील सर्व अटी - शर्ती मी / आम्ही वाचल्या असून, सर्व अटी-शर्ती मला / आम्हांला मान्य आहेत. आपले अटी/शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

मी / आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे मोतीचुर बुंदी लाडु, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद संस्थानकडुन वेळोवेळी बदल करणेत येणा-या रेसीपीजनुसार उपरोक्त कालावधीत संस्थानचे आवश्यक्तेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना बनवून व पॅकिंग करुन देण्याची हमी देतो.

नियमाप्रमाणे ई - निविदेची बयाणा रक्कम **रु.२,००,०००/-** (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) व निविदा शुल्क **रु.१५,०००/-** (अक्षरी - पंधरा हजार मात्र) निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाचे www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जमा केली असल्याची पावती स्कॅन करुन निविदेसोबत जोडलेली आहे.

मी / आम्ही आमची निविदा मंजूर झाल्यास योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा ०१ महिन्यांचे आत करुन देऊ, तसेच निविदा कामाच्या एकुण मुल्याच्या ३% पुर्णांकिंत, विनाव्याजी सुरक्षा अनामत रकमेचा भरणा पंधरा दिवसांचे आत संस्थानचे खातेवर जमा करणेत येईल. तसेच मंजूर दराने विषयांकीत काम दि. / /२०२२ ते दि. / /२०२२ अखेर पर्यंत माझेवर / आमच्यावर बंधनकारक राहील.

आपला / आपली विश्वासू,

फर्मचे मालकाचे / भागीदारांचे नांव | सही व शिक्का

(१)

(२)

## Technical Bid मधील कागदपत्रे

१) अन्न औषध प्रशासन यांचेकडील अद्यायवत केटरींग परवाना.

२) वैध लेबर लायसन्स प्रमाणीत प्रत

३) सनदी लेखापाल यांचे सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या मागील तीन वर्षाचे परिशिष्ट "ड" प्रमाणे उलाढाल प्रमाणपत्र ( Turnover Certificate)

४) पॅन कार्डची प्रमाणीत प्रत

५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (PF) कोड नंबर प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत

६) जी.एस.टी. (GST) प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत

७) कोणत्याही संस्थान / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांनी काळया यादीमध्ये समाविष्ट केले नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र.

८) मागील ०३ वर्षाचे आयकर भरण्यासंबंधीचे कागदपत्रे (Income Tax Returns)

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**लाडु व बर्फी  प्रसाद निर्मिती विभाग**
शिर्डी, तालुका - राहाता, जिल्हा– अहमदनगर, पिन - ४२३१०९

---

**प्रस्तावना –**

"श्रीं" चे दर्शन घेतल्यानंतर दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना साईबाबांचा प्रसाद घरी घेऊन जाता यावा, यासात्वीक उद्देशाने व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय, अधिनियम व आयएसओ चे नियमावलीस अधिन राहुन संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागामार्फत लाडु प्रसाद तयार करुन त्याचे लाडू प्रसाद वितरण काऊंटर्सवर  लाडू पाकीटांची विक्री केली होती तसेच सुटी बुंदी प्रसाद तयार करुन मंदिर दर्शनरांगेत भक्तांना मोफत बुंदी पाकीटे वाटप करण्यासाठी त्याचे ५० ग्रॅम वजनाचे पाकीटे पॅकींग करण्यात येत होते.

तथापि, लॉकडाऊननंतर संस्थान व्यवस्थापनाकडुन लाडु प्रसादाचे दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी लाडुचे निर्मिती प्रक्रीयेमध्ये बदल करण्यात आलेला आहे. नवीन प्रक्रीयेने (पध्दतीने) लाडु तयार करुन त्याची प्रशासकीय मान्यतेने लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत ५० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदी प्रसादाऐवजी त्याच वजनाचे ०१ नग लाडुचे पाकीट प्रसाद म्हणुन दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत वाटप करणेत यावे असे ठरले आहे. त्यानुसार दि.०६/०३/२०२१ रोजीपासुन कार्यवाही सुरु करणेत आली आहे.

त्याचप्रमाणे साई प्रसादालयामध्ये भक्तांना भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसादालयाचे दैनंदिन मागणीनुसार तयार करुन देण्यात येत आहे. सदरचे बुंदी लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करण्याचे काम लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत करण्यात येत आहे.

**कामाचे स्वरुप** – श्री साईबाबा संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील उक्त्या मजुरी दराने करावयाच्या कामांचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील -

**अ) मोतीचुर बुंदी लाडु तयार करुन०३ नगाचे व ०१ नगाचे पाकीट हाताने किंवा मशिनव्दारे** (प्रती नग ५० ग्रॅम) **पॅकींग करणे.**

१) मोतीचुर बुंदी लाडू तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (**उदा.** बेसनपीठ, साखर, गाईचे शुध्द तूप (गावरान), काजू, हिरवी विलायची, मगज बी, इंधन व पाणी इ.) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन पुरविण्यात येईल. मात्र सदर कच्च्या मालाची वाहतूक संस्थानचे वाहनाने मुख्य भांडार / उपभांडारमधून कंत्राटदार यांना त्यांचे स्वत:चे कामगारांकडुन करुन घ्यावी लागेल.

२) कंत्राटदारास देण्यात येणारे मालापैकी हरबरा दाळ बेसन आटा तयार झालेनंतर चाळण काढणे व हरबरा दाळ सुकविणे इ. कामांसाठी संस्थान कर्मचारी सांगतील त्याप्रमाणे आवश्यक्तेनुसार स्त्री / पुरुष कर्मचारी पुरविणेत यावेत.

३) बेसन पिठ लावतांना स्वच्छ पाणी वापरण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील, त्यासाठी नळी / बादलीचा वापर करणे कंत्राटदाराचे कर्मचा-यांवर बंधनकारक राहील.

४) संस्थानकडुन वेळोवेळी होणा-या रेसीपीजच्या बदलानुसार आपणास लाडु तयार करुन व पॅकींग करुन द्यावे लागतील. त्यासाठी वेगळा दर मागता येणार नाही / दिला जाणार नाही.

५) मोतीचुर बुंदी लाडु तयार करणेकामी वापरण्यात येणारा साखरेचा पाक तयार करणेसाठी व चाचणी घेणेसाठी कुशल व अनुभवी आचा-याची नेमणुक कंत्राटदारांस करावी लागेल. हवामानाच्या बदलानुसार चाचणीत बदल करणे आवश्यक राहील.

६) साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात लाडू प्रसाद १५० ग्रॅम वजनाचे पाकिटे दररोज सरासरी ५० ते ६० हजार पाकिटे तयार करुन दयावे लागतील व गर्दीचे काळात दैनंदिन ८० ते ९० हजारापर्यंत  लाडू प्रसाद पाकिटे बनवून दयावे लागतील.

७) भविष्यात लाडु प्रसादाची पॅकींग आकर्षक होणेसाठी ०५ नगाचे बॉक्स पॅकींग करणे  संस्थानचे विचाराधीन आहे, त्यानुसार आपणास संस्थानचे मागणीप्रमाणे पॅकींग करुन द्यावी लागेल. त्यासाठी वेगळा दर मागता येणार नाही / दिला जाणार नाही.

८) संस्थान प्रशासनाने सुटी बुंदीऐवजी (५० ग्रॅम वजनाचे ) त्याच वजनाचे ०१ नग लाडुचे पाकीट प्रसाद म्हणुन दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत वाटपासाठी दररोज सरासरी ४० ते ५० हजार लाडु प्रसाद पाकिटे तयार करावे लागतील व गर्दीचे काळात सुमारे ८० ते ९० हजारापर्यंत लाडु प्रसाद पाकीटे तयार करुन द्यावे लागतील.

९) गर्दीचे काळात लाडु तयार करणेकामी अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणुक करुन मागणीप्रमाणे आवश्यक मालाची पुर्तता करुन द्यावी लागेल.

१०) कर्मचा-यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे (जसे – केस कापणे, दाढी, नखे, शारीरिक इजा / दुखापत, त्वचेचे आजार, स्वच्छ गणवेश इ.) लक्ष ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यासाठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये दैनंदिन नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

११) लाडु तयार करण्याच्या कक्षात कर्मचा-यांना वापरावयाचे चप्पल / गमबुट, अ‍ॅप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील.

१२) लाडु पॅकींग करणेसाठी ५० ग्रॅम वजनाचे ०३ लाडुचे पाकीट व ५० ग्रॅम वजनाचे ०१ लाडुचे पाकीट याप्रमाणे पॅकींग करुन द्यावी लागेल. पॅकींगसाठी वापरण्यात येणारी उपकरणे (उदा.हिटींग पट्टया) कंत्राटदारांना स्वत: आणाव्या लागतील.

१३) किचनमधील सर्व साफसफाई व स्वच्छतेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराकडील कर्मचा-यांची राहील याबाबत कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. किचनमध्ये अस्वच्छता आढळल्यास कंत्राटदारावर योग्य तो दंड आकारण्यात येईल.

१४) मशिनव्दारे लाडु तयार करणेसाठी लागणारा कच्चा माल मशिनमध्ये टाकणेसाठी स्वतंत्र कर्मचा-यांची नेमणुक करावी लागेल. तसेच मशिनव्दारे तयार लाडु संपुर्ण सुकवुन पॅकींग करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१५) उपरोक्त कामासाठी लावलेल्या कर्मचा-यांना एक वेळ भोजन व एक वेळ चहा संस्थानतर्फे विनामुल्य दिला जाईल. मात्र निवासव्यवस्था कंत्राटदाराने स्वखर्चाने करावयाची आहे. त्याबदल्यात श्रींचे उत्सव कालावधीत तयार करणेत येणारे मिष्ठान्न कंत्राटदारांस बनवुन द्यावयाचे आहे. सदर कामाचा कोणताही मोबदला/मानधन दिले जाणार नाही.

**ब) सुटी बुंदी प्रसाद तयार करुन ५० ग्रॅमचे पाकीट हाताने किंवा मशिनव्दारे पॅकींग करणे. (***आवश्यकता भासल्यास)*

१) बुंदीप्रसाद तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. बेसनपीठ, साखर, गाईचे शुध्द तूप (गावरान), काजू, हिरवी विलायची, खिसमिस, इंधन व पाणी इ.) लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन पुरविण्यात येईल. कच्च्या मालाची वाहतूक संस्थानचे वाहनाने मुख्य भांडार/उपभांडारमधून कंत्राटदार यांना त्यांचे स्वत:चे कामगारांकडुन करुन घ्यावी लागेल.

२) कंत्राटदारास देण्यात येणारे मालापैकी हरबरा दाळ बेसन आटा तयार झालेनंतर चाळण काढणेकामी व हरबरा दाळ सुकविणेकामी संस्थान कर्मचारी सांगतील त्याप्रमाणे आवश्यक्तेनुसार स्त्री / पुरुष कर्मचारी पुरविणेत यावेत.

३) चाळलेले बेसन पिठात स्वच्छ पाणी वापरण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील, त्यासाठी नळी / बादलीचा वापर करावा.

४) सुटी बुंदी प्रसाद तयार करणेकामी वापरण्यात येणारा साखरेचा पाक तयार करणेसाठी व त्याची चाचणी घेणेकामी कुशल व अनुभवी आचा-याची नेमणुक कंत्राटदारांस करावी लागेल, हवामानाच्या बदलानुसार वेळोवेळी चाचणीमध्ये बदल करणे संबंधीत आचा-यावर आवश्यक/बंधनकारक राहील.

५) साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात सुटी बुंदी तयार करुन ५० ग्रॅम वजनाची पाकिटे तयार करुन दयावी लागतील. दररोज सरासरी ४० ते ५० हजार बुंदी प्रसाद पाकिटे तयार करावे लागतील. गर्दीचे काळात सुमारे ८० ते ९० हजारापर्यंत बुंदी प्रसाद पाकीटे तयार करुन द्यावे लागतील.

६) गर्दीचे काळात सुटी बुंदी प्रसाद तयार करणेकामी अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणुक करुन मागणीप्रमाणे आवश्यक मालाची पुर्तता करुन द्यावी लागेल.

७) कर्मचा-यांच्या वैयक्तिक स्वच्छतकडे (जसे – केस कापणे, दाढी, नखे, शारीरिक इजा/दुखापत, त्वचेचे आजार, स्वच्छ गणवेश इ.) लक्ष ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यासाठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये त्याची दैनंदिन नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

८) सुटी बुंदी तयार करण्याच्या कक्षात कर्मचा-यांना वापरावयाचे चप्पल/बुट, अ‍ॅप्रॉन, टोपी, मास्क हातमोजे इ. कंत्राटदारांस स्व-खर्चाने पुरवावे लागतील.

९) सुटी बुंदी पॅकींग करणेसाठी ५० ग्रॅम वजनाचे १ पाकिट याप्रमाणे पॅकींग करुन द्यावी लागेल. पॅकींगसाठी वापरण्यात येणारी उपकरणे (उदा.हिटींग पट्टया) कंत्राटदारांना स्वत: आणाव्या लागतील.

१०) बुंदी किचनमधील सर्व साफसफाई व स्वच्छतेची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील याबाबत कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. बुंदी किचनमध्ये अस्वच्छता आढळल्यास कंत्राटदारावर योग्य तो दंड आकारण्यात येईल.

११) मशिनव्दारे बुंदी प्रसाद पॅकींग करणेसाठी लागणारा कच्चा माल मशिनमध्ये टाकणेसाठी व तयार पाकीटे क्रेटसमध्ये मोजुन भरणेसाठीकंत्राटदारास अतिरिक्त कर्मचा-यांची नेमणुक करावी लागेल. तसेच सुटी बुंदी संपुर्ण सुकल्यानंतरच पॅकींग करावी लागेल याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची/त्यांचे कर्मचा-यांची राहील.

**क) बर्फी प्रसाद तयार करणे** – श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी रवा / खोबरा बर्फी प्रसादालय विभागाचे मागणीनुसार व आवश्यकतेप्रमाणे तयार करुन द्यावी लागेल. त्यासाठी स्वंतत्र आचारी / कर्मचा-यांची नेमणुक करावी लागेल. बर्फी प्रसाद तयार करणेकामी आवश्यक कच्चा माल (उदा. बेसनपीठ, साखर, तूप, रवा / खोबरा किस, इंधन व पाणी इ.) साई प्रसादालयाकडुन पुरविण्यात येईल. त्यासाठी लागणा-या कच्च्या मालाची वाहतूक संस्थानचे वाहनाने मुख्य भांडार / उपभांडारमधून कंत्राटदार यांना त्यांचे स्वत:चे कामगारांकडुन करुन घ्यावी लागेल.

**ड)** संस्थान साजरे करीत असलेल्या सर्व उत्सवातील (श्रीरामनवमी, गुरूपौर्णिमा, दसरा, दिपावली, नाताळ तसेच नववर्ष ) साई प्रसादालयातील भोजनाचे मिष्टान्नाचे पदार्थ व चिवडा, बुंदी इ. कंत्राटदारास त्यांचे कर्मचा-यांकडुन विनामुल्य बनवुन दयावे लागतील. त्यासाठी आवश्यक असणारे साहित्य श्री साई प्रसादालयाकडुन पुरविले जाईल.

### ❖ कामाची व्याप्ती –

साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात मोतीचुर लाडू प्रसाद १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडुचे एक पाकिट येणेप्रमाणे दररोज सरासरी ५० ते ६० हजार पाकीटे व गर्दीचे काळात दैनंदिन ८० ते ९० हजारापर्यंत लाडू प्रसाद पाकिटे बनवून द्यावयाचेआहेत.

तसेच सुटी बुंदीऐवजी (५० ग्रॅम वजनाचे ) त्याच वजनाचे ०१ नग लाडुचे पाकीट प्रसाद म्हणुन दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत वाटपासाठी दररोज सरासरी ४० ते ५० हजार लाडु प्रसाद पाकिटे तयार करावे लागतील

अचानक साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात वाढ झाल्यास गर्दीचे प्रमाणानुसार आवश्यकता भासल्यास सुटी बुंदी बनवून त्याचे ५० ग्रॅम वजनाचे पाकिटे पॅकींग करुन दयावी लागतील. सदरचे काळात दररोज सरासरी ८० ते ९० हजार बुंदी प्रसाद पाकिटे तयार करुन द्यावयाचे आहेत.

त्याचप्रमाणे साईभक्तांना भोजनात मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारा बर्फी प्रसाद प्रसादालयाचे मागणी व आवश्यकता वाटेल तेंव्हा तयार करुन द्यावा लागेल.

कंत्राटदाराने उपरोक्त नमुद कामाचे दर स्वतंत्ररित्या भरावयाचे असुन, निविदाधारकाने प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी कामाची पाहणी करुन दर भरावयाचे आहेत.

निविदा विचारात घेतांना उपरोक्त नमुद सर्व कामासाठी स्वतंत्रपणे दर प्राप्त झालेनंतर निम्नतम दरधारकांस कार्यादेश दिला जाईल.

### ❖ <u>निविदेच्या अटी व शर्ती -</u>

१. सदर निविदेचा वैध कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतीम दिनांकापासुन १२० दिवसांचा राहील.

२. मोतीचुर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन हाताने, मशिनने व बॉक्स पॅकिंग करणेबाबतचा कामाचा कालावधी कार्यादेश मिळालेपासुन ०१ वर्षासाठी राहील.

३. मोतीचुर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकिंग करणेबाबतचा संपुर्ण तपशिल उपरोक्त प्रस्तावनेत दिलेला आहे. त्याबाबत दर देतांना GST वगळुन दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

४. निविदेसोबत नियमाप्रमाणे बयाणा **रक्कम रु. २,००,०००/-** (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) व निविदा **शुल्क रु.१५,०००/-** (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर जमा करुन त्याची पावती जोडावी.

५. अन्न औषध प्रशासनाचा चालू वर्षाचा केटरींग परवाना, वैध लेबर लायसेन्स, प्रा.फंड कोड नंबर, पॅन कार्डची छायांकित प्रत, जी.एस.टी.नंबर व आयकर भरल्याची कागदपत्रे इ. सर्व स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत. पुर्वीचे निविदेसोबत दिलेली कागदपत्रे व बयाणा रक्कम विचारात घेतली जाणार नाही अथवा ग्राहय धरली जाणार नाहीत. निविदा सादर केल्यानंतर निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास संपुर्ण बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

६. यशस्वी निविदाधारकाला कामाच्या मुल्याच्या ३% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन संस्थानकडे ठेवावी लागेल.

७. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेली वैध कागदपत्रे विचारात घेतली जातील, वैधता संपलेल्या व निविदेसाठी संस्थानचे आवक विभागात आलेल्या लिफाफ्यांचा विचार केला जाणार नाही.

८. लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी तयार व पॅकिंग करणेचे दर देतांना ते GST सोडुन दयावेत. दिलेल्या दरांवर सरकारमान्य GST लावला जाईल. निविदेसोबत जोडलेल्या परिशिष्ट **"ब"** व परिशिष्ट **"क"** मध्ये दिलेल्या नमुन्यात दर नमुद करावेत. दर अंकी व अक्षरी स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे, दर नमुद करतांना खाडाखोड करु नये. अंकी व अक्षरी दरांमध्ये तफावत असल्यास कमी असलेला दर गृहीत धरण्यात येईल.

९. सदर उक्त्या मजुरी कामाच्या बीलांवरील सरकारमान्य GST संस्थान प्रशासनाकडुन ठेकेदारांस आदा केला जाईल. सदर GST ठेकेदाराने सरकारला भरुन त्याची पावती पुढील महिन्यांचे बिलासोबत सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. संस्थान प्रशासनाकडुन लाडु प्रसादाचे दर्जा व गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी वेळोवेळी बदल करणेत येणा-या रेसीपीजनुसार व मागणीनुसार लाडुचे पाकीटे पॅकींग करुन द्यावे लागेल, त्यासाठी कुठलीही दरवाढ दिली जाणार नाही.

११. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा / नाकरण्याचा हक्क श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

१२. निविदा शुल्कासाठी भरलेली रक्कम रु.१५,०००/- परत केली जाणार नाही, त्याप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील, त्यांना कामाची हमी म्हणून निविदेसोबत जमा केलेली बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यात येईल. सुरक्षा अनामत रक्कम ही कंत्राट कालावधी पुर्ण केल्यानंतर परत केली जाईल.

१३. मंजूर झालेल्या दराने लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी तयार करुन पॅकिंग करणे व पुरवठा करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. निविदाधारकाने काम करावयाचे नाकारल्यास त्याची संपुर्ण सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करणेत येईल. तसेच सदर ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल .

१४. बिल सादर करतांना बिलात आदेशातील वर्णनाप्रमाणेच संपूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरुपात उल्लेख करु नये.

१५. कामगारांचे पेमेंट महिन्याचे १० तारखेचे आत बॅक अकाऊंट पध्दतीने प्रत्येक कामगारांच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे, त्यासाठी संस्थानकडुन बीलाची रक्कम अदा केली जाण्याची वाट पाहु नये. त्याकामी GST व प्रा.फंडाची रक्कम दरमहा ५ तारखेच्या आत शासनाकडे जमा करुन सदरचे बील/कागदपत्रे लाडू व बर्फी प्रसाद विभागाकडे सादर करावे लागतील.

१६. **कामगारांचे पगार किमान वेतन कायद्यानुसार कर्मचा-यांच्या बॅक खात्यात वर्ग करणे व भविष्य निर्वाह निधीची रक्कम (PF) कामगारांचे खात्यावर भरणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील व दरमहा वेतन बॅकेत जमा केलेबाबतची बॅकेंची पोहोच व भविष्य निर्वाह निधीची रक्कम (PF) भरणा केलेची पावती इकडील विभागाकडे सादर करावी लागेल. याबाबत संस्थानची दिशाभुल केल्यास कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याचे कार्यकंत्राट रद्द करणेत येऊन, सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून, पुढील ०३ वर्षे कालावधीकरीता काळया यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल.**

१७. कामगारांचे पगार १० तारखेपर्यंत न केल्यास त्यानंतरच्या विलंबासाठी प्रति कामगार किमान रुपये १०/- इतका प्रतिदिन दंड आकारला जाईल व तो पुढील महिन्यांचे देयकामधुन वसुल केला जाईल.

१८. कंत्राटदाराने त्याचे कर्मचा-यांना वेतन आदा केलेबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर त्याबाबत खात्री झालेनंतरच पुढील ३० दिवसांचे आत आपण केलेल्या कामाचे बील आपणास आदा करण्याचा प्रयत्न राहील.

१९. निविदाधारकाने निविदा मंजुर झाल्यानंतर काही कारणास्तव कंत्राट घेण्यास नकार दिल्यास, निविदाकाराने निविदेसाठी भरण्यात आलेली निविदेची बयाना (EMD) रक्कम संस्थानखाती जमा (जप्त) करुन घेतली जाईल.

२०. उपरोक्त अटी-शर्तीत काही बदल सुधारणा करणे अथवा जादा अटी-शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकांची कोणतीही अट/अटी – शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२१. मोतीचुर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फीचा पुरवठा संस्थानचे मागणीप्रमाणे न झाल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून इतर ठेकेदाराकडून बाजारभावाने आवश्यक तेवढे मोतीचुर बुंदी लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी तयार करण्यात येऊन त्यासाठी ज्यादा लागलेल्या फरकाची रक्कम आपले बिलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करणेत येईल. सुरक्षा अनामत रकमेतुन खर्ची झालेली रक्कम प्रलंबीत किंवा पुढील देयकांतुन प्रतिपुर्ती करण्यात येईल.

२२. मोतीचुर बुंदी लाडू व सुटी बुंदी प्रसाद (आवश्यकतेनुसार) तयार करुन पेपर पिशवीत/बॉक्समध्ये व्यवस्थीत पॅकींग करुन *(५० ग्रॅम वजनाची सुट्टी बुंदी पाकीट व १५० ग्रॅम वजनाचे तीन नगाचे लाडू पाकीट व, ५० ग्रॅम वजनाचे ०१ नगाचे पाकीट)* द्यावी लागेल.

२३. कोणत्याही प्रकारे पदार्थ खराब झाल्यास त्याची नुकसान भरपाई कंत्राटदारास भरुन दयावी लागेल, त्यासाठी साखरेच्या पाकाची चाचणीकरीता अनुभवी व तज्ञ आचारी / व्यक्तींची नेमणुक करणे बंधकारक राहील. तसेच आपलेकडील कर्मचा-यांकडून मालाची नासधुस झाल्यास, त्या मालाची नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदाराचे दरमहा देय असणा-या रकमेतुन वसुल केली जाईल.

२४. मोतीचुर बुंदी लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागप्रमुख अगर कार्यालयातील कर्मचारी यांचे सुचनेप्रमाणे मालाचे परिमाण वापरुन सुमारे ५० ग्रॅम वजनाचे बुंदी पाकीट व १५० ग्रॅम वजनाचे लाडू पाकीट आवश्यकतेनुसार तयार करुन द्यावयाची आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित होणार नाही अशा प्रकारे आपले वर्तन ठेवावे. त्यांचे बरोबर उध्दटपणे, अर्वाच्य भाषेत बोलल्यास अगर मोठा वाद उद्भवल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरुन कंत्राट रद्द करणेत येईल.

२५. उपरोक्त कामासाठी लावलेल्या कामगारांचे कामावर देखरेख नियंत्रण इ.कंत्राटदाराने ठेवावयाचे आहे. विशेषत: स्वच्छता तसेच कामाचे ठिकाणी धुम्रपान व मद्यपान इत्यादी करणेस सक्त मनाई आहे याची विशेष काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे तसे आढळल्यास कंत्राटदारावर कडक कारवाई करण्यात येईल.

२६. मा.अन्न औषध प्रशासन महाराष्ट्र शासन यांचे नियमामध्ये वेळोवेळी होणारे बदल (रुल्स अॅन्ड रेग्युलेशन) कंत्राटदारावर बंधनकारक राहतील व त्यांचे निर्देशाप्रमाणे कामगारांचे आरोग्य / स्वच्छता इ. बाबतची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कंत्राटी कामगारांचे बाबतीत कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ (Workmen Compensation Act वर्कमॅन कॉम्पेन्सेशन अॅक्ट १९२३ ) नुसार कंत्राटी कामगारास नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास सदर नुकसान भरपाईची रक्कम भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ (प्रॉव्हीडंट फंड अॅक्ट १९५२ नुसार भरावी लागणारी अंशदानाची रक्कम प्रशासकिय चार्जेससह तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावे लागणारे किमान वेतन दर तसेच पेमेंट ऑफ वेजेस अॅक्ट १९६९ नुसार कंत्राटी कामगारांना विहीत मुदतीत वेतन अदा करणे इ. बाबींची कायदेशीर जबाबदारी ही कंत्राटदारावर बंधनकारक राहील त्याची तोशिष संस्थानला लागता कामा नये.

२८. यशस्वी निविदाधारकाला कामाच्या मुल्याच्या **३% इतकी अनामत रक्कम** निविदा स्विकृतीचे पत्र मिळालेपासुन १५ दिवसांचे आत संस्थानखाती किंवा लेखाशाखेत जमा करावी लागेल. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही, मागता येणार नाही. निविदा स्विकृतीचे पत्र दिल्यानंतर १५ दिवसांचे आत रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल, अन्यथा कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही.

२९. सदर कामासाठी लावलेल्या कामगारांचा रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी- एक लाख रूपये मात्र ) पर्यंतचा **अपघाती विमा** उतरविणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील, तसेच ESIC योजना लागू झाल्यास त्यातील तरतुदीनुसार सर्व सर्व कामगारांचे रजिस्ट्रेशन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३०. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांसंबंधी कंत्राटी कामगार नियम व निर्मुलन अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे हजेरी रजिस्टर, वेतन रजिस्टर व इतर संबंधीत सर्व रेकॉर्ड व दस्तऐवज विहीत नमुन्यात ठेवण्याची व त्यासंबंधी सर्व कायदेशीर पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

३१. सदर कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांचे ओळखपत्र, व्यवसाय कर, कामगार कल्याण निधी, आयकर, टी.डी.एस., उपदानाची रक्कम, सानुग्रह अनुदान / बोनस, Workmen Compensation Policy, पगारी रजा व सुट्टया घरभाडे भत्ता, विमा (इन्शुरन्स) इ.बाबत सर्व कायदेशीर ०१ महिन्याचे आत पुर्तता करणेची जबाबदारीही कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच Workmen Compensation Policy च्या बाबतीत ESIC योजना लागू झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३२. सदर काम उक्त्या मजुरी पध्दतीचे असल्याने कंत्राटदारांकडून कामास लावणेत आलेले कामगार व त्यांचे सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरु शकणार नाहीत / पात्र असणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कामगारांचा संस्थानशी कोणत्याही प्रकारे मालक - नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही.

३३. सदरचे कामाची प्रत (गुणवत्ता) समाधानकारक नाही, असे आढळून आल्यास किंवा भक्तांचे गर्दीचे प्रमाणात आवश्यक तेवढया संख्येने प्रसाद बुंदी व लाडू बनविणेचे काम न झाल्यास आवश्यक तेवढे लाडु/बुंदी/बर्फी प्रसाद इतर ठेकेदारांकडुन बाजारभावाप्रमाणे करुन घेणेत येईल व वाढीव खर्च आपले प्रलंबित देयकातुन वसुल केला जाईल.

३४. कंत्राटदार व त्यांचे कामगार यांच्यात काही वाद उपस्थित झाल्यास तो कंत्राटदाराने सोडवायचा आहे त्याची कोणतीही जबाबदारी संस्थानवर असणार नाही.

३५. कार्यकंत्राटाचा कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरीता नविन ठेकेदाराची निवड करणेकामी / ई-निविदा प्रक्रीयेचे कार्यवाहीसाठी अवधी लागत असल्यास व सदर कालावधीसाठी संस्थानने मुदतवाढ दिल्यास, आहे त्याच मंजूर दरात नविन ठेकेदाराची निवड होईपावेतो काम पुर्ण करावे लागेल. याबाबत कोणतीही दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

३६. लाडू बनविणेकामी व कामाची गती वाढविणेसाठी ॲटोमॅटीक लाडु निर्मिती व पॅकींग मशिनरी घेणे संस्थान प्रशासनाचे विचाराधीन आहे. मशिनरी खरेदी केल्यामुळे कंत्राटदाराचे काही प्रमाणात अथवा पुर्णत: काम बंद झाल्यास त्यास कंत्राटदाराला आक्षेप घेता येणार नाही. संस्थानकडे मशिनरी उपलब्ध झाल्यानंतर सध्याचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्यापुढील कालावधीसाठी नविन दर ठरविणेसाठी विहीत पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

३७. भविष्य निर्वाहनिधी अधिनियम १९५२ नुसार, आवश्यक त्या कागदपत्रांची तपशिलवार माहीती सोबत परिशिष्ट **"अ"** प्रमाणे आहे त्याची पुर्तता करणे आपणावर बंधनकारक राहील.

३८. गर्दीचा अंदाज न घेता अनावश्यक लाडुचा साठा करुन ठेवल्यास व तो खराब झाल्यास संस्थानचे होणारे नुकसान कंत्राटदाराचे नजीकचे बीलातून वसुल करण्यात येईल. सदरचे नुकसान टाळण्यासाठी संस्थानच्या मागणीप्रमाणेच माल तयार करुन देणेत यावा.

३९. निविदा ज्या फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने इतर सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता आढळुन आल्यास सदर निविदा फॉर्म ग्राहय धरला जाणार नाही. सदर निविदा अनाधिकृत समजून बाद ठरविण्यात येईल त्याबद्दल निविदाधारकास तक्रार करण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

४०. सदरचे कामासाठी लावणेत येणा-या कामगारांची वैदयकिय तपासणी संस्थानमार्फत संस्थानचे रुग्णालयात निशुल्क करण्यात येईल. संस्थानने ठरवून दिलेल्या वेळेत कर्मचा-यांची वैदयकिय तपासणी करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. संसर्गजन्य आजार किंवा त्वचारोग झालेल्या कर्मचा-यांकडुन सदरची कामे करुन घेता येणार नाही.

४१. अन्न सुरक्षा मानके कायदा- २००६ आणि नियम २०११ व ISO22000-2005 चे नियमानुसार स्त्री कामगार यांना डयुटीचे वेळेत (गळयातील मंगळसुत्र वगळता) अंगठी, नेलपेंट, बांगडी, कानातील भुषणे तसेच पुरुष कामगारांना हातातील कडे, धागे, अंगठी इ. वस्तु वापरणेस प्रतिबंध राहील. पुरुष कामगारांनी डयुटीचे ठिकाणी येतांना डोक्याची केस कापुन येणे, दाढी

करणे, हाताची नखे कापणे इ. सर्व कर्मचा-यांवर बंधनकारक राहील. कामावर असलेल्या सर्व कर्मचा-यांची वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४२. कंत्राटदारांस कोणत्याही कारणाकरीता आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कमेची मागणी करता येणार नाही.

४३. निविदेमध्ये नमुद केलेले कामाचे अंदाजे किंमतीएवढे काम देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

४४. **संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मितीकरीता टेंडर भरतांना निविदाधारकांची सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.५० लाख इतकी असावी. त्याबाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक राहील.**

४५. कंत्राटदारास त्यांचेकडील कंत्राटी कामगारांना भविष्यात शासनाकडुन किमान वेतनदरात वेळोवेळी लागु होणारे किमान वेतन दराने पगार देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. त्याबाबत संस्थानकडुन वाढीव मोबदला मागता येणार नाही.

४६. लाडु व बुंदी प्रसाद बनविणेच्या कामात, गुणवत्तेस निविदाधारक अपयशी ठरले अथवा गर्दीच्या प्रमाणात पुरेसे मनुष्य बळ वापरुन लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद पुरवीला नाही तर एकुण मासीक कामाच्या **बीलातुन ५% पर्यत दंडाची रक्कम** कपात केली जाईल. कपात केलेली रक्कम परत मागण्याचा अधिकार कंत्राटदारास राहणार नाही. तसेच अशा स्वरुपाच्या तक्रारी वारंवार आल्यास त्यास काळया यादीत (Black List) मध्ये टाकण्यात येईल व त्याची संपुर्ण सुरक्षा रक्कम जप्त केली जाईल, याबाबत कंत्राटदारास कोणतीही पुर्व सुचना दिली जाणार नाही.

४७. लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी बनविणेकामी लागणारे सर्व आवश्यक साहीत्य (उदा. कौचे, झारे, बुंदी काढणेसाठी पाट्या, स्टिल मग, बुंदी सुकविणेकामी व खोबरा बर्फी बनवितांना ट्रे मधुन बर्फी खाली टाकणेकामी चांगल्या प्रतीचा प्लास्टीक कागद / ताडपत्री इ. वगैरे) निविदाधारक यांनी स्वखर्चाने आणून वापरावयाचे आहेत व किचनमधुन तसेच उपभांडारमधुन माल ने-आण करणेसाठी लागणा-या हायड्रोलिक गाडया संस्थानकडून पुरविल्या जातील मात्र सदरची गाडी खराब झाल्यास / तुटल्यास / नादुरूस्त झाल्यास अगर नविन स्पेअर पार्ट बदलल्यास सदर स्पेअर पार्टची किंमत / नुकसान भरपाईची रक्कम ठेकेदाराचे देय्य होणा-या बिल रकमेतुन वसुल करणेत येईल.

४८. निविदाधारकांने Technical Bid मधील कागदपत्रांसोबत त्यांना कुठल्याही संस्थान / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेने काळया यादीत (Black List) समाविष्ठ केलेले नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहील.

४९. सदरचे निविदेतील सर्व अटी / शर्तीचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

५०. सदरील व्यवहाराबाबत काही वाद - विवाद निर्माण झाल्यास तो ज्यु.सिव्हील डिव्हीजन, राहाता / कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

५१. निविदेतील अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.),
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## परिशिष्ट- "अ"

---

## कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम- १९५२ नुसार कागद पत्रांची पुर्तता करणेबाबत ...

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आस्थापनेस एम्प्लॉईज प्रा.फंड ॲक्ट १९५२ लागू असल्याने श्री साईबाबा संस्थान यांचेकडील कॉन्ट्रॅक्टर मार्फत नेमलेल्या कामगारांना देखील हा ॲक्ट लागू होतो त्यामुळे आपण कामाकरीता नेमलेल्या कामगारांचे पगारपत्रकानुसार होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम दरमहा वेळेत भरणा करुन आवश्यक ती कागदपत्रे जमा करणे ही कंत्राटदाराची कायदेशीर जबाबदारी आहे.

***कंत्राटदारास खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.***

१) आपणास स्वत:चा प्रॉ.फंडाचा कोड नंबर असणे आवश्यक असून प्रॉ.फंडाचे कोड नंबर असलेबाबद पुरावा म्हणून पी.एफ कोड ड्राप्ट लेटरची सत्य प्रत टेंडर सोबत जोडावी लागेल.

२) कामाचे सुरुवातीस कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन)अधिनियम १९७० चे नियम २१(१) नुसार मा.सहायक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडून या कामाकरीता घेतलेली लेबर लायसेन्सची प्रत अथवा त्याबाबदचे प्रतिज्ञा पत्राची प्रत वरील संस्थान कामाकरीता घेतलेले लेबर लायसन्स मधील कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी कामास नेमलेले असतील तर प्रत्यक्षात किती कामगार नेमले याबाबदचे दरमहा पत्र द्यावे लागेल.

३) आपण सदर कामाकरीता नेमलेल्या कर्मचा-यांचे भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडील विहीत नमुन्यातील वारसदार फॉर्म भरुन देऊन सदर फॉर्म भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करण्याची जबाबदारी आपली राहील.

४) दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेले रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगार पत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (प्रत्येक महीन्याची स्वतंत्रपणे) संबंधीत विभागास सादर कराव्यात.

५) आपणास लाडू निर्मिती विभागाने काम दिलेले असल्याने त्याच्या अहवालावरुन कामाचा कालावधी निश्चीत करण्यात येईल व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

६) काम सुरु झालेनंतर महीना संपलेनंतर दुस-या महीन्याची १५ तारखेच्या आंत प्रॉ.फंडाची रक्कम भरणा करुन साधारणत: २० ते २५ तारखेला दरमहा उपरोक्त कागदपत्रे सादर करावी लागतील.

७) प्रत्येक महीन्याचे बीलावर मागील महीन्यातील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेबाबद शेरा देण्यात येतो, रक्कम भरुन कागदपत्रे सादर केल्याशिवाय शेरा देता येत नाही, कागदपत्रे वेळेत सादर न केलेस आपले बील वेळेत अदा होत नाही.

८) उपरोक्तप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणेस कंत्राटदारास विलंब झाल्यामुळे सदर कामाचे बील प्रलंबीत राहीलेस त्याची सर्वस्वी जवाबदारी कंत्राटदारावर राहील.

९) संस्थानकडील कंत्राट संपलेनंतर आपलेकडील कामगारांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणे संबंधीत कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

**<u>परिशिष्ट- "ब"</u>**

दिनांक ------------------

**<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने भरुन दयावयाचे दरपत्रक</u>**
**<u>कालावधी दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.३१ मार्च २०२३</u>**

१. गाईच्या शुध्द तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडुचे पाकीट )
**<u>हाताने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -------------------------------------)

२. गाईच्या शुध्द तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे ०१ नग लाडुचे पाकीट )
**<u>हाताने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -------------------------------------)

३. गाईच्या शुध्द तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडुचे पाकीट )
**<u>मशिनने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -------------------------------------)

४. गाईच्या शुध्द तुपातील मोतीचुर बुंदीचे लाडू तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे ०१ नग लाडुचे पाकीट )
**<u>मशिनने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -------------------------------------)

५. गाईच्या शुध्द तुपातील सुटी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पॅकेट )
**<u>हाताने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -----------------------------------------)

६. गाईच्या शुध्द तुपातील सुटी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकींग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (५० ग्रॅम वजनाचे एक पॅकेट )
**<u>मशिनने पॅकींग करणे.</u>** दर रु.--------------------- (अक्षरी रुपये -----------------------------------------)

७. वनस्पती तुपातील रवा / खोबरा बर्फी तयार करणे.
**प्रती क्विंटल** साखरेस दर रु. ----------------------- (अक्षरी रुपये -----------------------------------------)

- **टिप – नमुद केलेले दर GST सोडुन/वगळुन देण्यात आलेले आहेत.**
- **Note - Above all Rates are excludable of GST.**

❖ *सोबत अनुभवाचे दाखले व आवश्यक त्या खात्याच्या प्रमाणीत केलेल्या सत्य प्रती.*

१)

२)

३)

*फर्म/संस्थेचा सही व शिक्का*

# परिशिष्ट - "ड"

## <u>वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र</u>

दाखला देण्यात येतो की, मे. -------------------------------------------------------------------------------------- यांचे निविदेसंबंधित व्यवसायांची <u>सन २०१८-१९, २०१९-२० व २०२० - २१</u> या आर्थिक वर्षाची वार्षिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **वर्ष** | **वार्षिक उलाढाल** (रुपयांत) |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८ - १९ | |
| ०२ | सन २०१९ - २० | |
| ०३ | सन २०२० - २१ | |
| **सरासरी वार्षिक उलाढाल (Average)** | | |

**दिनांक :-** / /२०२२

**ठिकाण** –

लेखापरिक्षकाची सही *(Chartered Accountant)*

( नाव / सही व शिक्का )

नोंदणी क्रमांक -